
## जगभर हिंडताना...





# वैशिष्ट्यपूर्ण किल्ले आणि हवेल्यांचे ... राजस्थान

राजस्थान म्हणजे... पराक्रमाची आणि शौर्याची गाथा. जयपूर, जोधपूर, जैसलमेर, बिकानेर अशा कितीतरी महत्वाच्या ठिकाणी असलेले किल्ले आणि हवेल्या वैशिष्टयपूर्ण आहेत. जोधपूरचा मेहरानगढ, जयपूरचा हवामहल, स्वप्नभूमी जैसलमेर येथील हवेल्या, राजा महाराणा प्रतापांचे उदयपूर व चितौड, वैष्णवांचे मंदिर नाथद्वारा, माउंट आबूची ढिलवाडा मंदिरे आणि राणकपूरची शिल्पनगरी, रंगीबेरंगी बांधणी साडया, सुंदर कलात्मक अलंकार, मेवाड आणि मारवाड परिसरात महिनाभर राहिले तरी अपुरेच वाटेल अशी विविधता व सौंदर्य आहे.

**सोनाली मंगेश शिंदे - इ.९ वी**

## विज्ञानजगत



**● माशा त्यांचे पाय एकमेकांना का घासतात ?**

माशी ही माणसाची कट्टर शत्रू आहे हे २०व्या शतकात माणसाच्या ध्यानात आले. अनेक रोगांच्या साथी माशीमुळे फैलावतात.

माशी कुठेही बसते व कुठेही फिरते. जर भिंगामधून माशीचे शरीर पाहिले तर तिच्या पायांवर राठ केस दिसतात. माशीच्या जिभेवर एक चिकट पदार्थ असतो. उकिरडयावर बसलेली माशी तेथील घाण स्वतःबरोबर दुसरीकडे नेते व पायांवर पाय घासून तीच घाण दुस-या ठिकाणी टाकते. अशा रितीने प्राणघातक रोगांच्या जंतूंचा प्रसार होतो. स्वतःला स्वच्छ करण्याच्या उद्योगामुळे माशी माणसाचा घात करते. माशीच्या पायांच्या गिरघ्या असतात. त्यांना केस असतात. त्यातून एक चिकट द्रव पाझरतो. त्यामुळे माशी छतावर उलटी चालू शकते. उघडयावरचे अन्न खाऊ नये हाच रोगप्रतिबंधक उपाय.

**प्रगती सुधाकर मोरे - इ. ७वी**

**बातमी आनंदाची**

**प्रगती जत्रा :** ज्ञानरचनादाप्रमाणे प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण अधिक प्रभावी होतं. विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध प्रकल्पावर आधारित शैक्षणिक साहित्य, उपक्रम व खेळ यांची प्रगती जत्रा दि. ९-१० एप्रिल, २०१८ रोजी आमच्या शाळेत आयोजित करण्यात आली होती. शाळेतील आजी-माजी विद्यार्थी, पालक व इतर शाळांचे विद्यार्थी, शिक्षक व विभागातील शिक्षणप्रेमींनी या जत्रेस भेट दिली व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



## गुरुपौर्णिमा (आषाढ शु. पौर्णिमा)



**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरुवे नमः।।**



## इतिहास डोकावताना
## डॉ. आनंदीबाई जोशी

उच्च शिक्षण आणि परकीय विद्यापीठातून वैद्यकीय विद्येची पदवी घेणा-या आनंदीबाई जोशी या पहिल्या भारतीय महिला. धर्मरुढी, चालीरिती, संस्कृती आणि परंपरांची जपणूक करत परदेशात उच्च शिक्षण घेताना त्यांना खुप कष्ट पडले. पण आपल्या जिद्दी करारी आणि दृढनिश्चयी स्वभावाच्या बळावर त्यांनी आपले ध्येय गाठले. अमेरिकेतील फिलाडेल्फिया विद्यापीठातून त्यांनी दि. ११ मार्च १८८६ रोजी एम.डी.डी. ही वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोच्च पदवी प्राप्त केली. दि. १६ नोव्हेंबर १८८६ रोजी त्या भारतात परतल्या. हिंदुस्थानच्या लोकांच्या डॉ. आनंदीबाईंकडून खुपच अपेक्षा होत्या. परंतु काळाने त्या पूर्ण होऊ दिल्या नाहीत. दि. २६ फेब्रुवारी, १८८७ रोजी त्यांचे निधन झाले. परकीय विद्यापीठातील वैद्यकीय शिक्षण घेणारी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील पहिली भारतीय स्त्री म्हणून त्या अजरामर आहेत.

**कु. साहिल आंगणे - इ. १०वी**

## गणित

**रंजक माहिती**


| | | |
|---|---|---|
| १ ते १०० | संख्यांमध्ये एक अंकी एकूण संख्या | ९ |
| १ ते १०० | संख्यांमध्ये दोन अंकी एकूण संख्या | ९० |
| १ ते १०० | संख्यांमध्ये तीन अंकी एकूण संख्या | १ |
| १ ते १०० | संख्यांमध्ये ११ वेळा येणारा अंक | ० |
| १ ते १०० | संख्यांमध्ये २१ वेळा येणारा अंक | १ |
| १ ते १०० | संख्यांमध्ये एकक स्थानी ० अंक असलेल्या एकूण संख्या | १० |
| १ ते १०० | पर्यंत एकूण मूळ संख्या | २५ |
| १ ते १०० | पर्यंत मूळ संख्यांची बेरीज | १०६० |

**कु. श्रावणी हांडे इ. ६वी**

**सुविचार :** वर्तन म्हणजे विचार, उच्चार आणि आचार यांचा एकात्म अविष्कार.

**म्हणी :** १) हातचं सोडून पळत्याच्या मागे लागू नये. २) एक ना धड भाराभर चिंध्या

**संकलन -ऋतुजा सावंत - इ.९वी.**



# ग्रहणे चंद्रसूर्याची

सुर्यग्रहण हा निसर्गातील एक सुंदर अविष्कार आहे. अती व सुंदर आणि रोमांचकारी अनुभव असे त्याचे वर्णन करावे लागेल.

डायमंड रिंग च्या अप्रतिम फोटो तर तुमच्यापैकी अनेकांनी पाहिले असेल. बेलीज, बीडस, शॅडो बँडस, असंख्या सूर्यकोरी सूर्याच्या भोवतालचे प्रभामंडळ अशा अनेक गोष्टींची अनुभूती ग्रहणात येते. अशी ही सुंदरघटना निसर्गात नियमित घडत असते. ग्रहणांचे हे वेळापत्रक असते तरी कसे? ग्रहणांची कुटुंबे कशी असतात? राहू-केतूची ग्रहणात नेमकी कोणती भूमिका असते?

योग्य काळजी घेऊन ग्रहण कसे पहावे, अशा अनेकविविध प्रश्नांची उकल सहजतेने करुन दाखविली आहे. ग्रहणांविषयीची सोपी वाचनीय माहिती प्रश्नोत्तर स्वरुपात दिल्यामुळे वाचकांनी हवी असलेली माहिती चटकन मिळू शकेल. मग चला तर उघडा पुस्तक ...

तुम्हाला हवा तो प्रश्न काढा आणि सुरुवात करा.

**पुस्तकाचे नाव :** ग्रहणे चंद्र-सूर्याची- प्रश्न तुमचे उत्तर आमचे

लेखक : हेमंत मोने

## कल्पकता करुन तर पहा..

### कागदाच्या द्रोणाची फुले

**साहित्य :** प्रसादासाठी वापरतो ते कागदाचे द्रोण, रंगीत क्रेप पेपर, कार्डबोर्डचा तुकडा, दोरा, तार.

**कृती :** कागदाच्या द्रोणाला मधोमध कापून त्याचे दोन तुकडे करा. दोन्ही तुकड्यांच्या कडेने आतल्या बाजूस छेद देऊन त्याची झालर बनवा. आता कार्डबोर्डचे लहान रुपयाच्या नाण्याएवढे गोल कापून घ्या. त्यावर रंगीत क्रेप पेपर गुंडाळून खालच्या बाजूने दो-याने बांधून घ्या. जिथे दोरा बांधला आहे तिथेच तार गुंडाळून त्यावर हिरवा क्रेप पेपर गुंडाळून चिकटवा हा फुलाचा देठ तयार होईल. आता क्रेप पेपर गुंडाळलेल्या गोल कार्डबोर्डच्या तुकडया भोवती चिकटवा आणि दुसरी झालर त्यावरुन पुन्हा चिकटवा. या फुलाच्या पाकळया तयार होतील. पाकळयांच्या कडेशी पोस्टर कलरने हलकेच शेडींगही करु शकता.

**कु. स्नेहल मोरे - इ. ८वी**

सदर त्रैमासिक प्रगती विद्यामंदीर, भांडुप तर्फे प्रकाशित करण्यात आले आहे.



प्रगती मंडळ, साईहिल संचालित
प्रगती विद्या मंदीर
नरदास नगर, भांडुप, मुंबई
सा विद्या या विमुक्तये

# प्रगतीपर्व

वर्ष -१ अंक-२ | जुलै-२०१८ (गुरुपौर्णिमा)

## हितगुज....

प्रगती म्हणजे सुधारणा, मग मानवाच्या जीवनामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी नवनव्या कल्पना कृतीत आणाव्या लागतात. त्या कृतीत आणण्यासाठी मनापासून मेहनत घ्यावी लागते त्यामुळे मानवामध्ये अंत:बाह्य बदल घडू शकतो.

शिक्षण म्हणजे वाघीणीचे दूध, ते प्राशन केल्यावर माणूस गुरगुरतो. त्या शैक्षणिक प्रक्रियेमुळे माणूस व पशू वेगळे ओळखले जातात. नव शैक्षणिक धोरणामुळे आपल्याला ज्ञान रचनावाद कळाला. त्या ज्ञानाचा विकास साधण्यासाठी प्रगती पर्वाची स्थापना.

हि-याला अनेक पैलू पाडल्याशिवाय त्याचे मूल्य ठरत नाही. विद्यार्थ्यांमध्ये सर्वकाय संस्कार झाल्याशिवाय विद्यार्थी घडत नाही. त्यामध्ये सर्व काम वेळच्या वेळी व्हावीत, त्यात सातत्य व शिस्त असावी, अभ्यास, खेळ, वाचन, छंद घरातील लहानसहान कामे इत्यादी साठी दिल्या जाणा-या वेळेत सातत्य, संतुलन व ताळमेळ रहावा यासाठी या त्रैमासिकाचा प्रयत्न.

हे सर्व घडून येण्यासाठी "जो जे वांच्छिल तो ते लाहो" ही संतांची उक्ती प्रत्यक्षात येण्यासाठी हे प्रगतीपर्व.

श्री. दिलीप जंगले

## बातमी आनंदाची :

**इंग्रजी माध्यमातून प्रगती विद्यामंदीरमध्ये :** मातृभाषेतून शिक्षणाचे महत्व पालक हळूहळू ओळखू लागले आहेत. सुजाण पालक आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी आपल्या पाल्यांना मराठी माध्यमातून शिक्षण देत आहेत. शाळेच्या माजी विद्यार्थ्याने त्याच्या मुलांना २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून काढून प्रगती विद्यामंदीरमध्ये प्रवेश घेतला. या विद्यार्थ्यांचे स्वागत व पालकांचे योग्य निर्णयाबद्दल व आमच्या शाळेवर दाखविलेल्या विश्वासाबद्दल हार्दिक अभिनंदन!!

**पर्यावरण दिंडी :** आषाढी एकादशीचे निमित्त साधून विद्यार्थी व विभागातील नागरिकांमध्ये पर्यावरणविषयक जागरुकता निर्माण करण्यासाठी पर्यावरण दिंडीचे आयोजन करण्यात आलं होते. वृक्ष लावा वृक्ष जगवा, वृक्षवल्ली आम्हां सोयरे वनचरे, हा संदेश लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी शाळेच्या प्राथमिक व माध्यमिक विद्यार्थ्यांनी शिक्षक व मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनानुसार शेजारच्या विभागातून दिंडी काढली.